# निवेदन

औरंगाबाद विभागाच्या कृषि सेवक भरतीची जाहिरात क्रमांक जा.क्र.विकृसस/आस्था/कृ-०१/०२/कृसे/जाहिरात/६२/२०१९ दिनांक ०३.०१.२०१९ अन्वये प्रसिध्द करण्यात आली होती. दिनांक २२ ते २४ फेब्रुवारी २०१९ या कालावधीमध्ये महाऑनलाईनद्वारे विविध केंद्रावर परीक्षा घेण्यात आली होती. त्या परीक्षेचे अनुषंगाने उमेदवारांची सर्वसाधारण गुणवत्ता यादी www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २३ ऑगस्ट २०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती.

तथापि सदर सर्वसाधारण गुणवत्ता यादीमध्ये नाव नसल्याबाबत तसेच गुणांमध्ये तफावत असल्याबाबत काही उमेदवारांचे आक्षेप प्राप्त झाल्याने महापरीक्षा कक्षाकडून कृषि सेवक परीक्षेस बसलेल्या उमेदवारांच्या गुणांकन यादीबाबतच्या प्राप्त सुधारीत सी.डी.च्या आधारे सदर सर्वसाधारण अंतरीम गुणवत्ता यादी पुनश्च www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर यादीमधील उमेदवारांचे काही आक्षेप असल्यास दिनांक १६/०९/२०१९ पर्यंत आधारभूत कागदपत्रांसह **विभागीय कृषि सहसंचालक,औरंगाबाद विभाग औरंगाबाद, क्रांती चौक,अदालत रोड, रेमंड शोरुम समोर, औरंगाबाद** या कार्यालयास प्रत्यक्ष अर्ज सादर करण्यात यावा.विहित मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**स्थळप्रत मा.वि.कृ.स.सं.यांचे स्वाक्षरीत/-**

**प्रशासन अधिकारी**
**विभागीय कृषि सहसंचालक**
**औरंगाबाद विभाग औरंगाबाद**